# एडीसीसी बँकेच्या कारभारावर झालेल्या आरोपांना सत्ताधाऱ्यांचे प्रत्युत्तर

## नफा, ठेवी, कर्जवाटपात वाढीचा दावा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.१९) –** अमरावती जिल्हा सहकारी बँकेचे (एडीसीसी) संचालक रवींद्र गायगोले यांनी बँकेचे अध्यक्ष आणि सत्ताधारी संचालकांवर केलेल्या आरोपांनंतर, सत्ताधारी गटाने पत्रकार परिषदेत वस्तुस्थिती स्पष्ट करत आरोप फेटाळले. बँकेचा कारभार पारदर्शक असून, आर्थिक स्थिती उत्तम असल्याचा दावा यावेळी करण्यात आला.

संचालकांच्या म्हणण्यानुसार, बँकेला सन २०२१ मध्ये ८१ कोटी, २०२२ मध्ये २९ कोटी, २०२३ मध्ये ५७ कोटी तर २०२४ मध्ये ३४ कोटी रु. नफा झाला आहे. यंदा (मार्च २०२५ अखेर) बँकेचा ढोबळ नफा ५९ कोटी रु. असून शासनाकडून मिळणाऱ्या व्याज परतव्याचा निधी न मिळाल्याने आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीमुळे ६.२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च निव्वळ नफा कमी झाला आहे. याआधी वेतनवाढीचा वार्षिक खर्च केवळ ४० रु. लाख होता. बँकेने मागील दोन वर्षांत उद्दिष्टापेक्षा अधिक कर्जवाटप केले असून २०२३ मध्ये ५८९ कोटी रु., २०२४ मध्ये ६४७ कोटी आणि चालू वर्षात (२०२५) आतापर्यंत ६११ कोटींचे कर्जवाटप पूर्ण झाले आहे.

सप्टेंबर २०२५ पर्यंत ७५० कोटींचे लक्ष्य आहे. बँकेच्या ठेवी १,९०० कोटींवरून वाढून २,४०० कोटी रु.वर पोहोचल्या आहेत. हा आकडा बँकेच्या इतिहासातील सर्वोच्च असल्याचे सांगण्यात आले. बँकेचे भागभांडवलही वाढून सध्याची स्थिती १११ कोटी रु. आहे. शेतकऱ्यांसाठी नॅशनल लाईव्हस्टॉक मिशन (एनएलएम), सौरऊर्जा कर्ज योजना, एज्युकेशन लोन अशा नव्या योजना सुरू करण्यात आल्याचे सत्ताधारी संचालकांनी सांगितले.



### बांधकाम व हार्डवेअर खरेदीची पारदर्शकता

शाखा कार्यालयांच्या बांधकामाविषयी सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, अनेक शाखांमध्ये शौचालयाच्या सुविधा नव्हत्या किंवा इमारती जीर्ण होत्या. या कामांना मंजुरी मागील अध्यक्षांच्या कार्यकाळातच देण्यात आलेली होती. हार्डवेअर खरेदीबाबत सांगितले की, जुने संगणक १२ वर्षांपूर्वीचे असून त्यांचा कामावर परिणाम होत होता. नवीन सिस्टीम्स आवश्यक असल्याने खरेदी केली गेली. सत्ताधारी संचालकांच्या मते, बँकेचा कारभार व्यवस्थितपणे सुरु असून आर्थिक आणि प्रशासकीय बाबतीत बँक प्रगती करत आहे. त्यामुळे केलेले आरोप तथ्यहीन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# एचएसआरपी नोंदणीशिवाय वाहनविषयक होणार नाही कामकाज

**१६ जूनपासून अमंलबजावणी रण्यासाठी अमरावती आरटीओ कार्यालयाला मिळाले पत्र**

## जुनी वाहने चालवणाऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १९) –** राज्यातील सर्व जुन्या वाहनांसाठी (दि.१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेली) उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट (एचएसआरपी) बंधनकारक करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या आदेशानुसार व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर महाराष्ट्र शासनानेही याबाबत निर्णय घेतला असून, १६ जून २०२५ पासून अशा वाहनांवर कोणताही वाहनविषयक कामकाज एचएसआरपी बसविल्याशिवाय होणार नाही, अशी स्पष्ट सूचना परिवहन आयुक्त विवेक भिमणकर यांनी केली आहे. याबाबतचे पत्र अमरावती आरटीओ कार्यालयाला सुध्दा प्राप्त झाले आहे.



### उच्च सुरक्षा प्लेट बसवून घ्यावी

वाहन मालकांनी शासनाच्या संकेतस्थळावरून किंवा अधिकृत विक्रेत्यांकडून वेळेत एचएसआरपी नियुक्ती घेत आपल्या वाहनांवर उच्च सुरक्षा प्लेट बसवून घ्यावी, अन्यथा १६ जूनपासून त्यांचे वाहनसंबंधित कामकाज थांबवण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

राज्यातील जुन्या वाहनांसाठी उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट बसविणे बंधनकारक करण्यासाठी शासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून, त्याअंतर्गत संबंधित कार्यालयांनी तयारी सुरू केली आहे. परिपत्रकानुसार, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांसाठी वाहन हस्तांतरण, आरसी (नोंदणी प्रमाणपत्र) मध्ये पत्ता बदल, वाहन चढवणे/उतरवणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे, ना-हरकत प्रमाणपत्र जारी करणे, वाहनांमध्ये बदल करणे, परवाना नूतनीकरण व फिटनेस प्रमाणपत्र अशा आदी कार्यवाही एचएसआरपी शिवाय होणार नाही.

# धामणगाव गढीमध्ये युरिया खतावर लूट



**कृषी अधिकाऱ्यांची मूक संमती?**

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,(दि.१९)–** आदिवासी भागातील शेतकऱ्यांवर होणाऱ्या खत वाटपामध्ये मोठ्याप्रमाणात अन्याय होत आहे. धामणगाव गढी परिसरातील कृषी सेवा केंद्रांवर युरिया खतासाठी शेतकऱ्यांकडून अधिकृत दराच्या तुलनेत ३५० ते ४०० रुपयांपर्यंतची लुट केली जात आहे आहे. याला कृषी अधिकाऱ्यांची मूक संमती असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

### २६६ चा युरिया ४०० रुपयाला

युरिया खताची अधिकृत किंमत २६६ रुपये असूनही, स्थानिक दुकानदार शेतकऱ्यांना ते ३५० ते ४०० रुपये दराने विकत आहेत. ङ्गतुम्ही काही तक्रार केली, तर पुढच्या वेळी खतच मिळणार नाही,ङ्ग असा सरळ इशारा दिला जातो, असे सांगताना शेतकरी गोपाल शनवारे यांच्या डोळ्यांत अक्षरशः पाणी आले.

### खासगी विक्रेतेच नाही, तर अधिकारीही दोषी?

स्थानिकांनी आरोप केला की, ही लूट केवळ विक्रेत्यांची नसून कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्याही संगनमताने सुरू आहे. कृषी अधिकारी दुकानांवर येतात, पण चौकशीसाठी नाही – वाटा घेण्यासाठी,ङ्ग असा खुलासा एका स्थानिक खत विक्रेत्याने नाव गुप्त ठेवण्याच्या अटीवर केला.

### प्रशासन डोळेझाक का करतंय?

या प्रकाराकडे कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा परिषदेचे प्रतिनिधी आणि स्थानिक प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत. गावकऱ्यांमध्ये यामुळे रोष आहे. आम्ही आदिवासी, गरीब आहोत म्हणूनच कोणी ऐकत नाही, अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

### दोषी खतविक्रेत्यांवर फौजदारी करा!

बेकायदेशीर दराने खत विकणाऱ्यांवर त्वरित गुन्हे दाखल करावेत, संबंधित कृषी अधिकाऱ्यांची चौकशी करून निलंबनाची कारवाई करावी, शेतकऱ्यांना अधिकृत दरात खत मिळावे, याची सरकारने हमी द्यावी अश्या मागण्या शेतक:यांकडून करण्यात येत आहे.

### शासनाचे लक्ष कधी येणार?

राज्यात खतसंकट गडद असताना, आदिवासी भागात अशी खुलेआम लूट सुरु असणे ही गंभीर बाब आहे. शासनाने याची तातडीने दखल घेऊन चौकशी आणि कठोर कारवाई करणे गरजेचे आहे, अन्यथा शेतक?यांचा संताप स्फोटक रूप धारण करू शकतो.

# शिक्षकांचे आंदोलन पेटले: शासन आदेशाची 'अंत्ययात्रा'

## आंदोलक शिक्षक ताब्यात

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १९) –** ग्रामीण शिक्षण व्यवस्था व शिक्षकांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यासाठी प्रहार शिक्षक संघटना आक्रमक झाली असून, आंदोलनाने बुधवारी (दि. १८ जून) उग्र वळण घेतले. शासनाच्या १५ मार्च २०२४ रोजीच्या संचमान्यता आदेशाचा निषेध म्हणून आंदोलनकर्त्या शिक्षकांनी प्रतीकात्मक






'अंत्ययात्रा' काढून ती आयुक्त कार्यालयासमोर दहन केली. ङ्गशाळा वाचवा, शिक्षण वाचवाङ्ग आणि ङ्गशिक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं!ङ्ग अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला.

राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांच्या नेतृत्वात शेकडो शिक्षकांनी सहभाग घेतले. आंदोलन अधिक आक्रमक होताच गाडगेनगर पोलिसांनी कडक बंदोबस्तात ठाकरे यांच्यासह १२ आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेतले. यापूर्वी दुसऱ्या दिवशी शिक्षकांनी रक्तदान करून निषेध नोंदवला होता.

दरम्यान, माजी राज्यमंत्री व संघटनेचे संस्थापक बच्चू कडू यांनी विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून तातडीची बैठक घेण्याची मागणी केली. त्यानुसार, गुरुवारी (दि. १९ जून) सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली आहे. याबाबतचे लेखी पत्रही आयुक्त सिंघल यांनी दिले असून, त्यानंतर बेमुदत उपोषण तूर्तास स्थगित करण्यात आले आहे.

### मुख्य मागणी

ग्रामीण शिक्षण व्यवस्था धोक्यात आणणारा १५ मार्च २०२४ चा संचमान्यता शासन निर्णय रद्द करावा, अशी संघटनेची ठाम भूमिका आहे. पोलिसांनी ताब्यात घेतले असले तरी, हा लढा शिक्षण वाचवण्यासाठी असून तो अविरत सुरू राहील, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

# प्राचार्य डॉ.जयवंत वडते य.च.म.मुक्त विद्यापीठाच्या अमरावती विभागीय संचालकपदी रुजू



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १९) –** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ.जयवंत वडते यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अमरावती विभागीय केंद्राचे 'विभागीय संचालक' म्हणून नियुक्त झाली असून डॉ.वडते यांनी आज या पदाचा पदभार मावळते संचालक डॉ.सुभाष सोनोने यांच्याकडून स्वीकारला.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेतील एक वरिष्ठ प्राचार्य म्हणून डॉ.जयवंत वडते यांनी तिवसा, वरुड आणि धनवटे नॅशनल कॉलेज नागपूरचे प्राचार्य म्हणून कार्य केले असून महाविद्यालयीन आणि विद्यापीठ प्रशासनाचा त्यांना दांडगा अनुभव आहे. काल यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.संजीव अर्जुनराव सोनवणे यांनी वडते यांना स्वतः नाशिक येथे बोलावून यांना नियुक्तीपत्र दिले.यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.दिनेश भरड हे देखील उपस्थित होते. डॉ.जयवंत वडते यांनी आज विभागीय संचालक म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या मुक्त विद्यापीठ केंद्राचे संचालक डॉ.नितीन चांगोले, समन्वयक डॉ.कुमार बोबडे, डॉ.उमेश कडू, डॉ.किशोर साबळे, डॉ.सुभाष गावंडे, डॉ. गजानन भारती, डॉ.प्रशांत हरमकर, डॉ.गाडबेल,विवेक जाधव यांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या.

# शाश्वत गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे नीटमध्ये घवघवीत यश

**'वे एज्युकेशन इनोव्हेटिव्ह'च्या टेस्ट सिरीजचा ठरला निर्णायक फायदा**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १९) –** शाश्वत गुरुकुल, अमरावतीच्या विद्यार्थ्यांनी नीट (NEET) २०२५ परीक्षेत अपूर्व यश संपादन करत संपूर्ण अमरावती जिल्ह्याच्या शैक्षणिक नकाशावर भक्कम ठसा उमटवला आहे. विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, संस्थेचे अत्याधुनिक मार्गदर्शन आणि 'वे एज्युकेशन इनोव्हेटिव्ह'च्या प्रभावी टेस्ट सिरीज यांमुळे हे यश शक्य झाले आहे.

संस्थेतील अनेक गुणवंत विद्यार्थ्यांनी ५०० पेक्षा अधिक गुण मिळवत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी पात्रता मिळवली. विशेषतः याह्या इब्राहिम याने ६०८ गुण मिळवत देशपातळीवर ९१३ वा क्रमांक पटकावला. आदर्श पांडे (६०० गुण – १०४९ वा रँक), सुखवीर सिंग (६८९ गुण – २४१५ वा रँक), वंश गुप्ता (५५५), लक्ष्य दंडरे (५४२), निर्विघ्न शर्मा (५३०), युविका कुलश्रेष्ठ (५३०), मैथिली किरणपुरे (५११), अनुष्का गाडगे (५११) आणि हेमंत सिंग (५११) यांनीही उल्लेखनीय यश मिळवत संस्थेचा गौरव वाढवला. शाश्वत गुरुकुलचा अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन देणारी मेंटरशिप प्रणाली, तसेच तणावमुक्त व अभ्यासासाठी पोषक वातावरण यामुळे विद्यार्थ्यांची नीटस तयारी घडून आली. संस्थेचे संचालक आणि मार्गदर्शक मंडळी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करत त्यांना खंबीर राहण्यासाठी प्रेरणा देत राहिले.

> 'मी नीटची तयारी करत असताना 'वे एज्युकेशन इनोव्हेटिव्ह'च्या टेस्ट सिरीजचा मला खूप मोठा फायदा झाला. या सिरीजमुळे परीक्षेचा खरा अनुभव मिळाला. प्रश्नांची पातळी, वेळेचे नियोजन, आणि पेपर हाताळण्याची रणनीती मला इथे शिकायला मिळाली. अभ्यास कसा करायचा, चुका कुठे झाल्या हे समजवणारी टीमही मदतीला होती. त्यामुळे मी नीटच्या दिवशी पूर्ण आत्मविश्वासाने पेपर सोडवू शकलो.'
>
> **याह्या इब्राहिम, विद्यार्थी**

# श्रीगुरुदेव पेट्रोलियमसमोरील वळण बनले अपघाताचे केंद्रबिंदू

**दिशादर्शक फलकांचा अभाव बेततोय वाहनचालकांच्या जिवावर**





**महासागर प्रतिनिधी**
**तिवसा, (दि. १९) –** नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील मोझरी येथे नव्याने तयार झालेल्या बायपास रस्त्याचे काम नुकतेच पूर्ण झाले असले तरी, या मार्गामुळे अपघातांचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. विशेषतः श्रीगुरुदेव पेट्रोलियमसमोरील वळण अत्यंत धोकादायक ठरत असून, अनेक वाहनचालकांचे अचानक नियंत्रण सुटून अपघात होत आहेत. काही प्रकरणांमध्ये जीवितहानीही झाली आहे.

या बायपास रस्त्याच्या रचनेत स्पष्ट तांत्रिक त्रुटी दिसून येतात. वळणं अर्धवट, अस्पष्ट व रस्ता अरुंद आहे. त्यावर कुठलाही दिशादर्शक किंवा सावधगिरीचा फलक नसल्याने वाहनचालक गोंधळून जातात. याशिवाय, रात्रीच्या वेळी प्रकाशव्यवस्था अपुरी असल्यामुळे धोका अधिकच वाढतो. परिणामी, हा रस्ता मृत्यूचा सापळा ठरत आहे. नुकत्याच झालेल्या एका अपघातात भारसवाडी येथील युवकाचा मृत्यू झाला. तर मागील आठवड्यात एका मारुती ओमनी व्हॅनचा अपघात होऊन कंपनीतील अनेक कामगार जखमी झाले. वाहनांचेही मोठे नुकसान झाले आहे. मोझरी हे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जन्मस्थान असल्यामुळे येथे दरवर्षी हजारो भाविक भेट देतात. त्यामुळे या मार्गावर योग्य त्या सुरक्षिततेच्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

सध्या या रस्त्यावर कोणतेही दिशादर्शक फलक नाहीत. आधी लावलेले फलकही पडलेले असून निकृष्ट स्थितीत आहेत. परिणामी वाहनचालक व प्रवाशांमध्ये संभ्रमाची परिस्थिती निर्माण होते आहे. त्वरित दिशादर्शक फलक, स्पीड ब्रेकर व स्ट्रीटलाईट बसवून रस्त्याची रचना दुरुस्त करावी, अशी मागणी होत आहे.

### वळण अत्यंत धोकादायक

श्री गुरुदेव पेट्रोलियमसमोरचं वळण अत्यंत धोकादायक आहे. मी स्वतः पाहिलंय की अनेक वाहनचालक अचानक वळण आल्यावर गोंधळतात आणि नियंत्रण सुटतं. नुकत्याच घडलेल्या अपघातात एका युवकाचा बळी गेला. मागील आठवड्यात मारुती ओमनी अपघातात कामगार जखमी झाले. त्यामुळे त्वरित सूचना फलक लावणे, स्पीड ब्रेकर बसवणे आणि रात्रीसाठी दिव्यांची व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे.

**शुभम अस्वले, मोझरी**

### योग्य दुरुस्ती करून सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात

बायपास पूर्ण झाला तेव्हा वाटलं होतं की प्रवास सोयीस्कर आणि सुरक्षित होईल. पण प्रत्यक्षात अपघातांची मालिका सुरू झाली आहे. वळण समजत नाही, फलक नाहीत, रस्ता अरुंद आणि गोंधळात वाहनचालक अडकतात. संबंधित अधिकाऱ्यांनी तत्काळ योग्य दुरुस्ती करून सुरक्षिततेच्या उपायोजना कराव्यात.

**आझाद खान, तिवसा**

### आंदोलनाचा विचार करावा लागेल

नवीन मोझरी बायपास हा अतिशय धोकादायक नागरिकांसाठी बनलेला आहे विशेष करून जी मंडळी टू व्हीलर ने अपडाऊन करतात. त्या लोकांसाठी रस्ता ओलांडणे हा विषय फार कठीण होत आहे. कंत्राट असलेल्या कंपनीने कुठल्याही प्रकारचे मोठे फलक न लावता त्यासाठी लावण्यात आलेले फलक हे रस्त्याच्या कडेला पडून जण खात आहे. यावर कोणत्याही लोकप्रतिनिधीचे लक्ष नाही, ही भरपूर मोठी शोकांतिका आहे. शासन आणि संबंधित कंपनी जागे होऊन योग्य तो निर्णय घेतील; नाहीतर आम्हाला समस्त तालुका वासियांना आंदोलनाचा विचार करावा लागेल हे मात्र तितकेच नक्की

**लकी शापामोहन, तिवसा**

# स्पर्धात्मक युगात रोजगारासाठी कौशल्य विकास अत्यावश्यक

**आजीवन अध्ययन विभागात एम.ए. आजीवन अध्ययन व विस्तार अभ्यासक्रम**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. १९) –** अमरावती, ब्युरो. आजच्या स्पर्धात्मक काळात रोजगार निर्मितीसाठी कौशल्य विकास हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. भारतासारख्या विकसनशील देशात बेरोजगारीचे प्रमाण अधिक असून त्याचा विपरीत परिणाम तरुणांवर होत आहे. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्वांना रोजगार मिळेलच, याची हमी नसल्यामुळे अनेक तरुण उच्च शिक्षण पूर्ण करूनही बेरोजगार राहतात. ही समस्या कमी करण्यासाठी भारत सरकारने कौशल्याधारित शिक्षणाला प्राधान्य दिले आहे.

शासनाच्या निर्देशानुसार अनेक विद्यापीठांत विद्यार्थ्यांसाठी कौशल्यपूर्ण शिक्षण बंधनकारक करण्यात आले असून, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या




आजीवन अध्ययन व विस्तार विभागात एम.ए. आजीवन अध्ययन व विस्तार हा पदव्युत्तर अभ्यासक्रम २०१९-२० पासून सुरू आहे. या अभ्यासक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर बनवणे, व्यावसायिक दृष्टीकोन तयार करणे, तसेच मूल्य शिक्षण आणि लाईफ स्किल्सद्वारे त्यांच्यात सामाजिक उत्तरदायित्व जागवणे हा आहे. हा अभ्यासक्रम केवळ शैक्षणिक मर्यादित नसून विविध सर्जनशील उपक्रम, प्रशिक्षण, परिसंवाद, व्याख्याने, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. स्वयंसेवी संस्था, समाजकल्याण विभाग, महिला व बालकल्याण, आदिवासी विकास अशा क्षेत्रांमध्ये कार्य करण्यासाठी आवश्यक कौशल्ये या माध्यमातून विकसित केली जातात. कोणत्याही शाखेचा पदवीधर, गृहिणी, लघु व्यावसायिक, ज्येष्ठ नागरिक या अभ्यासक्रमात वयाची अट न ठेवता प्रवेश घेऊ शकतात. २ वर्ष (४ सेमिस्टर) ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही माध्यमांतून हा अभ्यासक्रम आहे. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. प्रशांत भगत व प्रा. वैभव जिसकार यांच्या संपर्क साधण्याचे तसेच कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे. इच्छुकांनी थेट विभागात संपर्क साधून प्रवेश निश्चित करावा, असे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे.

### घरगुती महिलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सहभाग

प्रत्येक वर्षी गृहिणी महिला, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, लघु व्यावसायिक यांचाही अभ्यासक्रमात सक्रिय सहभाग असतो. यांच्यासाठी संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व विकास, कार्यपद्धती, व्यवस्थापन कौशल्य आदींचे प्रशिक्षण दिले जाते. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यामुळे सामाजिक स्तरावर प्रभावी कार्यशक्ती निर्माण होण्यास मदत होते. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांनी स्वयंसेवी संस्थांमध्ये नोकरी मिळवली असून काहींनी स्वतःचा व्यवसायही सुरू केला आहे. यामुळेच हा अभ्यासक्रम रोजगाराभिमुख ठरत आहे.

# कोरोना, २० दिवसांत ११ रुग्ण पॉझिटिव्ह

## २ रुग्ण खासगी रुग्णालयात उपचाराधीन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. १९) :** कोरोनाने पुन्हा डोके वर काढले असून गेल्या २० दिवसांत जिल्ह्यात ११ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत. यापैकी दोन रुग्ण सध्या सक्रिय असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागाने दिली आहे.




कोरोनाचे नाव जरी कानावर आले तरी नागरिकांना लॉकडाऊनच्या आठवणींनी घेरून टाकले आहे. २०२२ पासून कोरोनाचा प्रभाव कमी झाला होता. मात्र आता पुन्हा कोरोनाबद्दल भीतीचे वातावरण तयार होऊ लागले आहे. राज्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणेच अमरावती जिल्ह्यातही कोरोनाचे रुग्ण सापडू लागले आहेत. आरोग्य विभागाच्या नोंदीनुसार गेल्या २० दिवसांत ११ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले. यापैकी ४ रुग्ण ग्रामीण भागातील असून ७ रुग्ण महानगरपालिकेच्या हद्दीतील आहेत. सध्या महापालिका क्षेत्रातील दोन रुग्ण सक्रिय आहेत.

### जिल्हा रुग्णालयात 'कोरोना वॉर्ड' कार्यान्वित

जिल्हा सामान्य रुग्णालयात वॉर्ड क्रमांक १० मध्ये पुन्हा कोरोना विभाग सुरु करण्यात आला आहे. पॉझिटिव्ह रुग्णांवर येथे उपचार केले जात असल्याची माहिती जिल्हा रुग्णालय प्रशासनाने दिली.

जिल्ह्यात नव्याने ११ रुग्ण आढळले असून त्यापैकी ७ जण बरे होऊन घरी गेले आहेत. उर्वरित ४ रुग्ण खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

**डॉ. सुरेश आसोले, जिल्हा आरोग्य अधिकारी**

# अचलपूर कृउबासमध्ये दिवसाढवळ्या लाखोंची चोरी

## सीसीटीव्हीमध्ये चोर कैद

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि. १९)–** अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती (कृउबास) परिसरात गुरुवारी (दि. १९) भरदिवसा लाखोंची रोकड चोरी गेल्याने व्यापारी आणि शेतकरी वर्गात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना बाजार समितीच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली असून, पोलीस तपास सुरु आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बंडू बंसगोपाल अग्रवाल या व्यापाऱ्याने 'श्री जय अंबे ट्रेडर्स' या आपल्या दुकानातून शेतकऱ्यांना देयक देण्यासाठी बँकेतून ४ लाख ८० हजार रुपयांची रोख रक्कम काढून दुकानातील लाकडी गल्ला पेटीत ठेवली होती. मात्र, काही वेळाने अग्रवाल दुकानाबाहेर गेले असताना, आधीपासून रेकी केलेल्या चोरट्याने संधी साधून गल्ला पेटी लंपास केली. प्रत्यक्षदर्शींच्या




माहितीनुसार, चोराने ही पेटी उचलून बाजार समितीच्या बाहेर थांबलेल्या दुसऱ्या एका वाहनाजवळ नेली आणि तिथे थांबलेल्या आपल्या साथीदारासह पळ काढला. चोर अल्पवयीन असल्याचे सांगितले जात आहे. ही संपूर्ण घटना समितीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाली असून, परतवाडा पोलीस स्टेशनचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. त्यांनी सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून चोरट्यांची ओळख पटवण्यासाठी तपास सुरू केला आहे. भरदिवसा, बाजार सुरू असताना एवढी मोठी चोरी झाल्याने परिसरातील व्यापारी आणि शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे. व्यापाऱ्यांनी पोलीस प्रशासनाकडे या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने चोरट्यांचा शोध घेण्याची मागणी केली आहे. सुरक्षा व्यवस्था आणि गस्त वाढविण्याची मागणीही या निमित्ताने पुन्हा जोर धरू लागली आहे.

# एपीएमसीचे माजी संचालक गोपाल राणे यांची आत्महत्या

## राठी नगरातील घरी लावला गळफास | आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. १९) :** अमरावतीतील राठी नगर परिसरातील रहिवासी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक आणि कट्टर शिवसैनिक गोपाल बाळासाहेब राणे (वय ५४) यांनी गुरुवारी दुपारी आपल्या राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. संजय बंड गटाचे ते कट्टर समर्थक होते. पोलिसांनी घटनास्थळी सुसाईड नोट जप्त केली असून, पुढील तपास सुरू आहे.



गोपाल राणे यांचा मूळ गाव चांदूर बाजार तालुक्यातील देवरी निपाणी आहे. त्यांच्या वडिलांचा शिवसेनेशी जुना आणि दृढ संबंध होता. तेव्हापासून संपूर्ण कुटुंब शिवसेनेशी जोडले गेले होते. गोपाल राणे स्वतःही शिवसेनेत सक्रिय होते व स्थानिक राजकारणात ओळख निर्माण केली होती. त्यांच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. पोलीस अधिका?यांनी सांगितले की, आत्महत्येपूर्वी त्यांनी चिठ्ठी लिहिली असून ती तपासासाठी पाठवण्यात आली आहे. सुसाईट नोटमध्ये काही जणांची नावे असल्याची माहिती पुढे येत आहे. या घटनेमुळे अमरावतीतील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, स्थानिक शिवसैनिकांमध्ये शोककळा पसरली आहे.

# खोटे कागदपत्रांचा धाक दाखवून २५ लाखांची मागणी

**अमरावती, (दि. १९) –** गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका प्लॉटच्या दुरुस्ती लेखातून बेकायदेशीर ताबा मिळवण्याच्या उद्देशाने बनावट नकाशा तयार करण्यात आला. त्या बनावट कागदपत्रांचा धाक दाखवून २५ लाख रुपयांची मागणी केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी महेश चेतनदास बजाज (४८, रामलक्ष्मण रेसिडेन्सी, शिवनेरी, सिंधी चौक, अमरावती) यांच्या तक्रारीवरून विष्णु बंसीलाल व्यास (५५) व एका महिलेविरुद्ध गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. महेश बजाज यांचा प्लॉट नांदगावपेठमधील शेगाव प्रगणे येथील डोले ले-आऊटमध्ये आहे. आरोपी विष्णु व्यास व संबंधित महिलेनं फसवणूक व तोतयागिरी करून चुकीचा दुरुस्ती लेख तयार केला. या लेखात मूळतः ९.२० चौ.फुटांची दुकान जागा असूनही चुकीच्या पद्धतीने बनावट नकाशा तयार करून १११५.४७ चौ.फुट क्षेत्र असल्याचे दाखवले. त्यावर आधारित दुरुस्ती लेख नोंदवून फसवणूक करण्यात आली. या प्रकारानंतर आरोपी विष्णु व्यास यांनी महेश बजाज यांच्याकडे २५ लाख रुपयांची मागणी केली. बनावट दस्तावेजांचा धाक दाखवत २५ लाख मागितल्याची तक्रार महेश बजाज यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली.

## खोट्या कॉलमुळे पोलिसांची दमछाक

**अमरावती –** सार्वजनिक हेल्पलाईन ११२ वर गुरुवारी (दि. १९) एका अनोळखी व्यक्तीने ङ्गएका तरुणाची हत्या झाली असून घटनास्थळी एके-४७ रायफल आहे,ङ्ख असा खळबळजनक कॉल केल्यानंतर संपूर्ण अमरावती पोलिस विभागात खळबळ उडाली. माहिती मिळताच पोलीस, सीआरपीएफ, श्वान पथक आणि वरिष्ठ अधिकारी तातडीने अकबर नगर परिसरात दाखल झाले. मात्र तपासाअंती ही माहिती खोटी असल्याचे स्पष्ट झाले. पोलिस तपासात समोर आले की, आसिम खान अजीम खान (वय ३३) या युवकाने स्वतःच्या हातावर ब्लेडने जखम करून खोटा कॉल दिला होता. तो मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. घटनास्थळी कोणतीही रायफल, मृतदेह अथवा हिंसाचाराचे पुरावे आढळले नाहीत. या प्रकारामुळे पोलीस यंत्रणेची ऊर्जा आणि वेळ वाया गेला. त्यामुळे पोलिसांनी आसिम खान विरोधात खोटी माहिती देणे व पोलिसांना दिशाभूल करणे या आरोपाखाली गुन्हा दाखल केला आहे.



# बडनेरा रेल्वे स्थानकात मालगाडीचे डबे रुळावरून घसरले!

## मुख्य मार्ग सुरळीत; यार्डमध्ये घडला अपघात

**अमरावती, (दि. १९)–** बडनेरा रेल्वे स्थानकाच्या यार्डमध्ये बुधवारी सायंकाळी ६.२० वाजताच्या सुमारास मालगाडीचा एक डब्बा रुळाखाली उतरल्याची घटना घडली. ही घटना कि.मी. ६६१/१७ या स्थळी, साईड अप लूप लाईनवर घडली असून मुख्य अप-डाऊन लाईनवर याचा कोणताही परिणाम झालेला नाही. दोन्ही मुख्य रेल्वे मार्ग सुरळीत सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच रेल्वे विभागाचा कर्मचारी वर्ग तत्काळ घटनास्थळी दाखल झाले असून आवश्यक दुरुस्ती आणि डब्बा हटविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. याआधीही याच परिसरात अशा प्रकारच्या घटना घडल्याची नोंद आहे. दरम्यान, संध्याकाळच्या वेळेस या मार्गावरून अनेक मेल व एक्सप्रेस गाड्या मुंबईच्या दिशेने जात असतात, मात्र यावेळी मुख्य मार्ग सुरळीत असल्याने प्रवाशांना कोणतीही अडचण झाली नाही. रेल्वे विभागाने दक्षता घेत डब्बा रुळावरून हटविला असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

# धारणीत २२ वर्षीय विद्यार्थी तरुणाची आत्महत्या

## परिसरात हळहळ

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,(दि.१९)–** धारणी शहरातील सिव्हिल लाईन परिसरात गुरुवारी पहाटे २२ वर्षीय युवकाने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. मृत युवकाचे नाव सुयोग दीपक पाचोळकर असे असून, तो भूगर्भशास्त्र (एमएससी जिओलॉजी) विषयात उच्च शिक्षण घेण्यासाठी पुण्याला जाण्याच्या तयारीत होता. मात्र, पुण्यास रवाना होण्याच्या काही तासांपूर्वीच त्याने आयुष्य संपवले.

सुयोगचे वडील दीपक पाचोळकर हे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेत शिक्षक आहेत. त्यांच्या बदलीमुळे संपूर्ण कुटुंब सध्या धारणी येथे वास्तव्यास आहे. सुयोगने पदवीपर्यंतचे शिक्षण अमरावतीत पूर्ण केले होते आणि आता पुण्यात एमएससी भूगर्भशास्त्राच्या पहिल्या वर्षासाठी



प्रवेश घेणार होता. गुरुवारी सकाळी झोपेतून उठला नाही म्हणून आईने खोली उघडून पाहिल्यानंतर त्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. तात्काळ त्याला रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून, सुयोग हा अभ्यासू आणि शांत स्वभावाचा मुलगा होता, अशी माहिती शेजाऱ्यांनी दिली. घटनेनंतर धारणीचे उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून, पुढील तपास सुरू आहे.

# सौम्या शर्मा यांनी स्वीकारला महानगरपालिका आयुक्तपदाचा कार्यभार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.१९)–** अमरावती महानगरपालिकेच्या आयुक्तपदाची सूत्रे सौम्या शर्मा (चांडक) यांनी गुरुवारी स्वीकारली. माजी आयुक्त सचिन कलंत्रे यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारून महानगरपालिकेच्या कामकाजात नव्या उर्जेने योगदान देण्याची ग्वाही दिली.


पूर्वी दिल्ली, नांदेड जिल्ह्यातील देगलूर, नागपूर जिल्हा परिषद व स्मार्ट सिटी प्रकल्पात मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या सौ. शर्मा यांनी विभागप्रमुखांची ओळख करून घेतली. या प्रसंगी झालेल्या बैठकीत माजी आयुक्त कलंत्रे यांनी त्यांचे स्वागत करत अनुभवाची देवाणघेवाण केली. त्यांनी कार्यपद्धतीत गती, शिस्त आणि दर्जा या तीन बाबींवर विशेष भर देण्याचे आवाहन केले.



नवनियुक्त आयुक्त शर्मा यांनी पत्रकारांशी संवाद साधताना, ङ्गनागरिकांच्या प्राथमिक गरजांची पूर्तता, स्वच्छता, महिला सशक्तीकरण यास प्राधान्य दिले जाईल. अमरावतीला मोठ्या शहरांच्या बरोबरीने उभे करणे हा प्रयत्न असेल. आर्थिक स्रोत बळकट करणे व चांगल्या प्रशासनासाठी निर्णयक्षमतेने काम केले जाईल,ङ्ख असे स्पष्ट केले.या वेळी माजी आयुक्त कलंत्रे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, कर्मचारी आणि पत्रकार उपस्थित होते.


# 'पीएम मित्रा' मेगा टेक्सटाईल पार्क निर्मितीस गती

- २२० केव्ही नव्या उपकेंद्राच्या स्थापनेसाठी हालचाली सुरू
- उपकेंद्रामुळे उद्योगांना अखंड व गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा
- अमरावतीच्या औद्योगिक विकासाला मिळणार चालना




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.१९)–** अमरावती जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रात एक नविन पर्व सुरू होण्याच्या वाटेवर असून, केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'पीएम मित्रा' मेगा टेक्सटाईल पार्क प्रकल्पाच्या उभारणीच्या हालचालींना आता गती मिळत आहे. या प्रकल्पाच्या वीज गरजेसाठी २२० केव्ही क्षमतेचे स्वतंत्र अती उच्चदाब वीज उपकेंद्र उभारले जाणार असून, या कामासाठी महावितरण आणि महापारेषण यंत्रणा सज्ज होत आहे.



अमरावतीतील नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरात हे टेक्सटाईल पार्क उभारले जात आहे. या पार्कमध्ये देश-विदेशातील अनेक मोठ्या कंपन्यांचे गुंतवणुकीचे प्रस्ताव असून, त्यासाठी विश्वसनीय व अखंड वीजपुरवठा अत्यावश्यक आहे. ही गरज लक्षात घेता महावितरणने २२०/३३ केव्ही क्षमतेच्या उपकेंद्रासाठी विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करून ९ एप्रिल २०२५ रोजी मुख्य कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठवला होता. महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासणीनंतर मुख्य कार्यालयाने काही तांत्रिक सुधारणा सुचविल्या होत्या.

त्या सुधारणा पूर्ण करून हा अहवाल दिनांक १७ जून रोजी अंतिम मंजुरीसाठी पुन्हा सादर करण्यात आला आहे. मंजुरी मिळताच, महापारेषण कंपनीमार्फत प्रत्यक्ष उपकेंद्र उभारणीचे काम सुरू होणार आहे. उद्योगांना अखंड व स्थिर वीज मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. टेक्सटाईल पार्कसाठी लागणाऱ्या उच्च क्षमतेच्या वीजपुरवठ्याच्या दृष्टीने हे उपकेंद्र अत्यावश्यक असून, अमरावतीसारख्या प्रगतिशील जिल्ह्याला औद्योगिक दृष्टिकोनातून नवे स्थान मिळवून देण्याची ही संधी आहे.

### 'पीएम मित्रा' विदर्भातील औद्योगिक विकासासाठी दिशा दर्शक

'पीएम मित्रा' टेक्सटाईल पार्कमुळे वस्त्रोद्योगातील नव्या संधी, निर्यातक्षम उत्पादन, स्थानिक रोजगारनिर्मिती आणि कौशल्यविकास यांना चालना मिळणार आहे. या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील तरुणांना नव्या संधी उपलब्ध होतील आणि महिला उद्योजिकांसाठीही विविध व्यावसायिक संधी खुल्या होतील. महावितरण आणि महापारेषणकडून अशा प्रकारच्या पायाभूत सुविधा वेळेत पुरवून जिल्ह्याच्या औद्योगिक वातावरणात विश्वासार्हता निर्माण केली जात आहे. स्थिर आणि गुणवत्तापूर्ण वीज पुरवठा हा औद्योगिक विकासाचा कणा मानला जातो. त्यामुळे हे उपकेंद्र केवळ एक पायाभूत प्रकल्प नसून, अमरावती जिल्ह्याच्या आर्थिक स्वावलंबन आणि औद्योगिक प्रगतीचा पाया ठरेल. 'पीएम मित्रा' टेक्सटाईल पार्क आणि २२० केव्ही उपकेंद्र हे दोन्ही प्रकल्प आगामी काळात विदर्भातील औद्योगिक विकासासाठी दिशा दर्शक ठरतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

GOVERNMENT OF MAHARASHTRA

AMRAVATI ELECTRICAL DIVISION,
PUBLIC WORKS DEPARTMENT, AMRAVATI.
E-TENDER NOTICE NO. 23 FOR 2025-2026

Online tenders in B-1 form are invited by Executive Engineer, Amravati (Electrical) Division, Public Works Division, Amravati on behalf of Governor of Maharashtra from qualified bidders for the following works under E-Tender procedure.

| Sr. No. | Name of work | Amount Put to Tender | E.M.D. |
|---|---|---|---|
| 1 | Estimate No. 274/EE/AMT/2025-26: Providing & Installation of BLDC Fans & Air Conditioner to Various Building at Govt. Engineering College, Dist. AMRAVATI | 2041108/- | 20500/- |
| 2 | Estimate No. 331/EE/AMT/2025-26: Providing Additional 200 KVA Transformer to Sub District Hospital, ACHALPUR, Dist. Amravati. | 1296898/- | 13000/- |
| 3 | Estimate No. 362/EE/AKI/2025-26: Providing Three Years Maintenance Contract for 2 Nos. Lift of Kone Elevator Make at Gynie Building in Govt. Medical College & Hospital, AKOLA | 1058294/- | 10600/- |

As per G.R. No.CAT-2022/PR.KR. 50/BLD.2/Mantralaya, Mumbai, Dt. 11.05.2022 & DL. 12.05.2022 Post Qualification Criteria of the Bid Capacity is Applicable for the Bidder who have been allotted or declared L.I for 3. (Three) Works during this FININCIAL YEAR till submission of Bid for this Work,

Tender form conditions of contract, specifications and contract drawings can be downloaded from the eTendering portal of Public Works Department, Government of Maharashtra i.e. https://mahatenders.gov.in after entering the details, payment of Rs. 590/- (Including GST) (Rupees Five Hundred Ninety Only) (Including GST should be paid online using payment gateway. The fees of tender document will be non refundable, Further information regarding the work can be obtained from the above office.

: TENDER SCHEDULE:

| | | |
|---|---|---|
| Cost of Tender Form | : | Rs. 590/-+ (Including GST) |
| Pernod of download of bidding document | : | From 20.06.2025 Time 10.00 Hours To 27.06.2025 Time 18.55 Hours |
| Pre bid conference date, time and venue | : | Not Applicable |
| Receipt of online EMD, Tender Document fees, to be paid online only via Payment Gateway mode Only. | : | Document Tender Fee and EMD to be paid via online mode only. Through bidders own account |
| Place time and date of opening technical bids | : | Office of the Executive Engineer, P.W. (Electrical) Division, Amravati. Date 30.06.2025 Time 11.00 to 18.55 Hours |
| Place, Time and date of opening financial bids | : | Office of the Executive Engineer, P.W. (Electrical) Division, Amravati. Date 30.06.2025 Time 11.00 to 18.55 Hours |
| Performance Security Deposit | : | If the Lowest Tenderer has quoted below the Scheduled cost by more than 1%, he should submit Performance Security Deposite in the form of Bank Guarantee/Demand Draft/F.DR. in the office of The Executive Engineer, Public Works (Electrical) Division Amravati within 8 days from the opening of Envelop No 2 as per Govt. Circular No. CAT/2017/ C. No 08/Bld-2. Dt 26/11/2018. |
| Registration class of Contractor | : | Contractor Registered in Appropriate Class |

Ir. No/Es. En./(Ele)/Amt/T.C/ 1530/2025
Office of the Executive Engineer (Electrical) Division
Amravati P.W. (Electrical) Division,
P.W.D. Compound, Camp, Amravati.
Email: elamaravati neilmahapud gov.in
Date: 16/06/2025.

Executive Engineer
Amravati Electrical Division
Public Works Division
Amravati

वि.मा.का./अम/जाहि./ २४८/ २०२५-२०२६

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शहरातून निघणारा कचरा उठला गावकऱ्यांच्या जीवावर

## शिरजगाव ग्रामस्थांनी घेतली आक्रमक भूमिका | अंजनगाव सुर्जी न.प.चा बेजबाबदारपणा





**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, (दि.१९)–** अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाने शहरातील घनकचऱ्याच्या व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणावर हलगर्जीपणा दाखवत आता ग्रामीण भागातील नागरिकांनाही त्रासदायक परिस्थितीत ढकलले आहे. शहरातून निघणारा हा कचरा गावकऱ्यांच्या जीवावर उठला आहे. शिरजगाव (शेरकर) गावाजवळच्या मुख्य रस्त्यावर शहरातील कचरा टाकल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला असून त्यांनी आज कचरा आणणाऱ्या घंटागाड्यांना परत पाठवत नगरपरिषदेविरोधात ठणकावून विरोध नोंदवला.

शहरातून गोळा होणारा कचरा पूर्वी अंजनगाव–अकोट मार्गावरील डंपिंग यार्डमध्ये टाकला जात होता. मात्र तेथे कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची कोणतीही सुविधा नसल्यामुळे कचऱ्याचा डोंगर तयार झाला होता. त्यामुळे नव्या जागेच्या शोधात कंत्राटदाराने अंजनगाव–शिरजगाव रस्त्यालगत असलेल्या पालिकेच्या जागेवर, जिथे केवळ ओला कचरा टाकण्याचीच परवानगी आहे, त्याठिकाणी संपूर्ण घनकचरा टाकण्यास सुरुवात केली. या प्रकरणाची तीव्र दखल घेत नागरिकांनी आमदार आणि खासदारांशी संपर्क साधत तक्रार दाखल केली असून, नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांशी चर्चाही सुरू आहे. कचरा व्यवस्थापनातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारावर कठोर कारवाईची मागणीही नागरिकांनी केली आहे.

### धुराचे लोट, प्रदुषण, दुर्गंधी

डंपीग ग्राउंडचा कचरा जळत असल्याने शिरजगाव परिसरात उष्णतेच्या दिवसांत धुराचे लोट, प्रदुषण व दुर्गंधी पसरवित आहे. आता पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट झाली असून, मृत जनावरे व शहरातील कचरा भर रस्त्यावर टाकल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पॉलिथीनसारख्या घटकांमुळे शेतीचेही नुकसान होत असल्याने शेतकरी धास्तावले आहेत. रस्त्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे वाहतूक अडथळलेली असून, सुसाट धावणाऱ्या घंटागाड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे आज शिरजगावचे नागरिक एकत्र आले आणि त्यांनी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. नागरिकांनी स्पष्ट भूमिका घेत, ङ्गजोपर्यंत आमच्या परिसरात कचरा टाकणे थांबत नाही आणि याबाबत नगरपरिषद लिखीत आश्वासन देत नाही, तोपर्यंत रस्त्यावरील कचरा उचलू दिला जाणार नाही आणि कोणतीही घंटागाडी कचरा खाली करू शकणार नाही,अशी ठाम भूमिका घेतली.

# अचानक दिसणारे स्पीड ब्रेकर ठरताहेत 'यमदुत'

- कुठलेच सूचना फलक नसल्याने अपघात वाढले
- चांदूरबाजार–शिराळा मार्गावर समस्यांची यादी





**बादल डकरे**
**चांदूर बाजार,(दि.१९)–** चांगल्या रस्त्यांचे नियोजन जर योग्य पद्धतीने नसेल, तर ते रस्ते नागरिकांच्या जिवावरही बेतू शकतात. असाच एक गंभीर प्रकार चांदूरबाजार येथील बेलोरा चौक ते शिराळा मार्गे अमरावती या मुख्य रस्त्यावर घडत आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (चडठऊ)च्या दुर्लक्षीतपणामुळे या मार्गावरील गतीरोधक (स्पीड ब्रेकर) नागरिकांसाठी यमदुत ठरत आहेत.

बेलोरा चौकातील एचडीफसी बँकेसमोर वाहतूक नियंत्रणासाठी टाकण्यात आलेल्या स्पीड ब्रेकरवर कोणतेही सूचना फलक लावले गेले नाहीत. त्यामुळे वाहनचालकांना ब्रेकरचे अचानक दर्शन होते आणि अनेकदा ते अपघातास कारणीभूत ठरतात. परिसरातील सुशिक्षित नागरिकांमध्ये यामुळे हा ब्रेकर अनधिकृत आहे का, अशी चर्चा सुरू आहे. या मार्गावर मागील काही दिवसांत किरकोळ अपघात घडले असून, ओव्हरलोड टिप्पर व ट्रकमधून पडणाऱ्या रेतीमुळे रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे. दुर्दैवाने सामान्य नागरिक असल्याने या अपघातांची कुठेही नोंद झाली नाही.

### सिग्नल यंत्रणा बेपत्ता

बेलोरा गावाकडे वळणाऱ्या चौकात सिग्नल यंत्रणा नाही. यामुळे अपघातांची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे. हे सर्व असूनही प्रशासन व एमएसआरडी विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. यामुळे जर भविष्यात एखादा मोठा अपघात घडला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत. विकासाच्या नावाखाली नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असून, संबंधित विभागांनी तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी आता होत आहे. प्रशासन या बाबतीत जागे होणार का, की आणखी एखाद्या मोठ्या दुर्घटनेनंतरच हलतील? हे येणारा काळच ठरवेल.

### सायलेन्स झोन नाही

याशिवाय या रस्त्यालगत अनेक रुग्णालये असूनसुध्दा येथे सायलेंस झोन नाहीत. वाहनांच्या आवाजामुळे येथे ध्वनी प्रदूषण वाढले आहे. याचा मानसिक व शारीरिक त्रास रुग्णांसह परिसरातील नागरिकांना सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, १०० मीटरच्या आत चार युटर्न असूनसुद्धा कुठेही सूचना फलक लावलेले नाहीत. भक्तीधाम मंदिर, शाळा, तसेच रेल्वे फाटकासारख्या महत्त्वाच्या ठिकाणांबाबत देखील कोणतीही माहितीफलक लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे चालकांसाठी रस्ता अधिकच धोकादायक बनला आहे.

# खड्ड्याने घेतला युवकाचा बळी!

## अमरावती–परतवाडा मार्गावरील खड्ड्यांनी पुन्हा घेतला जीव

**ट्रक आणि टाटा एसची भीषण धडक**





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती (दि. १९) –** अमरावती ते परतवाडा रस्त्यावरील अत्यंत धोकादायक झालेल्या अवस्थेने आज पुन्हा एका युवकाचा बळी घेतला. मार्की फाट्याजवळ ट्रक आणि टाटा एस यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात नमन सगणे (वय अंदाजे २५, रा. निंभारी) याचा जागीच मृत्यू झाला असून पिकअप चालक यश गोळे (३१, रा. कोल्हा काकाडा) गंभीर जखमी झाला आहे.

बुधवारी (दि.१८) सकाळी सुमारे ११:३० च्या सुमारास वलगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही दुर्घटना घडली. खोल खड्डा चुकवण्याचा प्रयत्न करत असताना ट्रक व टाटा एसमध्ये धडक झाली. यात बाजूच्या सीटवर बसलेला नमन सगणे याचा जागीच मृत्यू झाला. चालक यश गोळे गंभीर जखमी असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. त्याला जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर काही क्षणातच परिसरात मोठी गदी झाली. वलगाव पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल होऊन वाहतूक सुरळीत केली. अपघाताचे पंचनामे करण्यात आले असून ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे.

### रस्त्यांची दयनीय अवस्था पुन्हा चर्चेत

या अपघातामुळे अमरावती–परतवाडा मार्गावरील रस्त्यांची दयनीय अवस्था पुन्हा चर्चेचा विषय बनली आहे. अनेक ठिकाणी खोल खड्डे असून त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याची स्थानिकांची तीव्र भावना आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले आहे. 'रोजचा प्रवास म्हणजे जीव मुठीत घेऊन जाणे,' अशी भावना वाहनचालकांमध्ये आहे. गावक?यांनी स्पष्टपणे सांगितले की, ठेकेदार केवळ काम उरकून मोकळे होतात, देखभाल करत नाहीत. मग जबाबदारी कोणाची? असा प्रश्न या अपघातामूळे पुन्हा उद्भवला आहे.

### पाळा येथील बकरी लंपास

**अमरावती :** मोर्शी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पाळा येथील पंचफुला चिरकुटराव बोरवाल (वय ७५) यांची दोन वर्षांची बकरी अज्ञाताने चोरी केली. या बकरीची किंमत अंदाजे १२ हजार रुपये असल्याचे त्यांनी सांगितले. पंचफुला यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# राज्यातील शाळांमध्ये होणार मोबाईल बंदी?

## शिक्षक सुधीर केनेंचे संशोधन : आ. सुमित वानखेडे लावणार लक्षवेधी



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर रेल्वे,(दि.१९)–** देशातील भावी पिढीचे भवितव्य उज्वल करायचे असेल शाळांमध्ये मोबाईल बंदी करणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारच्या शाळांमध्ये विद्यार्थ्याच्या मोबाईल वापरावर बंदी यावी याकरिता आर्वी मतदार संघाचे आमदार येत्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडणार आहे. विशेष म्हणजे आ.वानखेडे यांनी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांचेशी पत्रव्यवहार करून मोबाईल बंदी करण्याबाबत विनंती केली आहे. अमरावती जिल्ह्यातील शिक्षक सुधीर केने यांच्या संशोधनाची दखल घेत त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

अमरावती जिल्ह्यातील चांदूर रेल्वे तालुक्यातील वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालयाचे माध्यमिक शिक्षक सुधीर पंजाबराव केने यांनी मोबाईल बंदी संदर्भात संशोधन केले आहे. गत पाच वर्षापासून त्यांनी विद्यार्थ्यांच्या वर्तनाबाबत नोंदी घेतल्या असून या बाबत बालरोग तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ, नेत्र तज्ज्ञ, अस्थी रोग तज्ज्ञ, मेंदू विकार तज्ञांच्या मुलाखती घेतल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मोबाईलच्या व्यसनामुळे विद्यार्थ्याना भविष्यात कॅन्सर, मानदुखी, विसरभोळेपणा, चिडचिडेपणा, अंधत्व, चक्कर येणे अश्या अनेक आजाराची झपाट्याने लागण होत असल्याचे तज्ज्ञ डॉक्टरांचे मत आहे. या सर्वांमुळे नवीन पिढीचे भवितव्य धोक्यात आले आहे.

मोबाईल वरील गेम, सोशल मीडियाच्या अती वापराने विद्याथी हिंसक बनली आहे. परदेशप्रमाणे अमरावतीच्या विद्यार्थ्यांच्या दफ्तरमध्ये बंदूक आढळून आल्याची घटना नुकतीच गाजली आहे. आश्ट्र ेलियासारख्या प्रगत देशाने विद्यार्थ्याना सोशल मीडियावर बंदी घालून संसदेत कायदा पारित केला आहे. बोहरा समाजाने सुध्दा मुलांच्या मोबाईल वापरावर बंदी घातली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र राज्यातील शाळांमध्ये मोबाईल बंदी यावी यासाठी सुधीर केने यांनी आ.सुमित वानखेडे तसेच मुख्यमंत्री यांचेशी पत्रव्यवहार केला आहे. या पत्राची दखल घेत आ. सुमित वानखेडे येत्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### शासनाकडून नवोपक्रमाची दखल

सुधीर केने यांनी त्यांच्या शाळेतील इयत्ता ५ ते १२ वी विद्यार्थ्यांवर मोबाईल बंदी करून संशोधन केले. त्यांना विद्यार्थ्यांच्या आळस कमी होऊन गुणवत्ता वाढीस लागल्याचे दिसून आले आहे. या नवोपक्रम दखल राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांनी घेत सुधीर केने यांना सन्मानित केले आहे.

# उद्याचे राष्ट्र म्हणजे आजची संस्कारित संतती– पियुष यावले

## अनिवासी श्रीगुरुदेव जीवन विद्या सुसंस्कार शिबिराची सांगता



**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,(दि.१९)–** 'भारतीय संस्कृतीतील १६ संस्कारांचे मूर्त स्वरूप हे सुसंस्कार शिबिर आहे. आजच्या युगात व्यसन, भ्रष्टाचार, बलात्कार, व्यभिचार यांसारख्या सामाजिक व नैतिक संकटांवर मात करण्याचे शिक्षण अशा शिबिरातून दिले जाते. हे शिबिर म्हणजे रामकृष्ण काळातील गुरुकुल संस्कारांची पुनर्रचना आहे.' असे प्रतिपादन अनिवासी श्रीगुरुदेव जीवन विद्या सुसंस्कार शिबिराचे व्यवस्थापक पियुष महाराज यावले यांनी केले.

अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम यांच्या तत्वप्रणालीनुसार, श्रीगुरुदेव सेवा मंडळ शहीद यांच्या वतीने आयोजित ७ ते १५ जून या कालावधीत आदिवासी भवन, बेनोडा शहीद येथे पार पडले. यावेळी समारोपीय कार्यक्रमात ते बोलत होते. सुमारे ५० विद्यार्थ्यांनी या शिबिरात सहभाग घेतला. या शिबिराचा मुख्य उद्देश 'उद्याचे राष्ट्र म्हणजे आजची संस्कारित संतती' या भावनेतून प्रेरित होता. १२ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर आदी संतांच्या विचारांवर आधारित शिक्षण देण्यात आले. प्रातःस्मरण, योग, प्राणायाम, ध्यान, कराटे, लेझीम, लाठी–काठी, मल्लखांब, भगवद्गीता पठण, मराठी श्लोक, संत चरित्र अभ्यास, आयुर्वेद, निसर्गोपचार, सामुदायिक प्रार्थना, बौद्धिक सत्र, आदर्श दिनचर्या इ.चा समावेश होता.अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे जीवन प्रचारक रामदासपंत चोरोडे गुरूजी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच रजनी कुबडे, उपसरपंच उत्तम पोटोडे, डॉ. विलास अढाऊ, राम पांडे, योगेश गावंडे, अनिल खोडस्कर, अशोकराव पाचघरे, रंजना फरकाडे आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी सुरेश तिजारे, पियुष यावले, अपेक्षा चौधरी, संजना जावरकर, मनीषा खंडार, प्रणव चौधरी, यश ढोंगे, वेदांत अढाऊ, पियूष गोहाड, गौरव जाधव आदींनी परिश्रम घेतले.

# विदर्भ कृषी सेवा केंद्रावर कृषी विभागाची धाड

## 'अजित १५५' कपाशी बियाण्याचा अवैध साठा उघड | परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर (दि. १९) :** खरीप हंगाम सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर दर्यापूरमधील विदर्भ कृषी सेवा केंद्रावर कृषी विभागाच्या भरारी पथकाने बुधवारी सायंकाळी छापा टाकून 'अजित १५५' या कपाशीच्या वाणाचा मोठ्या प्रमाणात अवैध साठा उघडकीस आणला. या बियाण्याची मागणी अधिक असल्याने दुकानदाराने कृत्रिम तुटवडा निर्माण करून जास्त दराने विक्री करण्याचा प्रयत्न केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. तालुका कृषी अधिकारी आरती साबळे, पंचायत समितीचे कृषी अधिकारी सुरेश रामागडे, उपअधिकारी संतोष राणे, सहाय्यक कृषी अधिकारी प्रशांत हाडोळे आणि आनंद गावंडे यांच्या पथकाने सदर कारवाई केली. तपासणीदरम्यान दुकानदाराला बियाण्याचा स्रोत विचारण्यात आला, मात्र त्याच्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यामुळे हा साठा बेकायदेशीर असल्याचा स्पष्ट संशय निर्माण झाला.

### बियाण्यांचा साठा शेतकऱ्यांना वितरित

महत्वाचे म्हणजे, आढळलेला साठा कृषी विभागाने जप्त न करता थेट शेतकऱ्यांना वितरित केला, त्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर बियाणे मिळाले आणि त्यांनी समाधान व्यक्त केले. संबंधित कृषी केंद्र चालकाकडून मिळालेल्या उडवाउडवीच्या उत्तरांनंतर, कृषी विभागाने या प्रकरणी परवाना रद्द करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या कारवाईमुळे तालुक्यातील इतर कृषी केंद्रांमध्ये खळबळ उडाली असून, अधिकाऱ्यांनी बियाणे विक्रीत पारदर्शकता राखण्याचे आवाहन केले आहे.

# शाळा स्तरावर शाळा प्रवेशोत्सव साजरा होणार

## जिल्ह्यातील १०० शाळांना पदाधिकारी, अधिकारी यांची भेट | विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश व बूट–मोजे मिळणार



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.१९ ) –** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधोरेखित करणा?या २००९ च्या कायद्यानुसार, प्रत्येक बालकाचे नाव शाळेच्या पटावर नोंदवले जाणे आणि त्याला नियमित, गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे आवश्यक आहे. या उद्देशाने अमरावती जिल्ह्यात २३ जून रोजी शाळा स्तरावर 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात साजरा केला जाणार आहे.

शाळेचा पहिला दिवस बालकांसाठी संस्मरणीय व्हावा, त्यांना शाळेशी आत्मीयता वाटावी, आणि शिक्षण हे आनंददायी वाटावे यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने विशेष योजना आखली आहे. जिल्ह्यातील १०० शाळांमध्ये खासदार, आमदार, जिल्हाधिकारी, गटविकास अधिकारी, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, डायटचे प्राचार्य, सरपंच आणि शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश, तसेच बूट व मोजे वाटप केले जाणार आहेत. शालेय पोषण आहारात गोड पदार्थांचा समावेश असेल. नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांची प्रभातफेरीही आयोजित केली जाईल, मात्र त्यात यांत्रिक वाहनांचा वापर वर्ज्य करण्यात आलेला आहे.

### तीन दिवस चालणार विविध उपक्रम

प्रवेशोत्सवाच्या तयारीसाठी २१ जून रोजी शाळा परिसराचे स्वच्छता व सुशोभीकरण, वर्गखोलींची स्वच्छता, अभ्यास साहित्याची मांडणी, पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांचे निर्जतुकीकरण, स्वच्छतागृहांची स्वच्छता, व वृक्षारोपणाची तयारी केली जाणार आहे. त्याच दिवशी आंतरराष्ट्रीय योग दिनही साजरा होईल. २२ जूनला शासन निर्देशानुसार समित्यांच्या सभा, लोकप्रतिनिधींना निमंत्रण, लेखा अद्यावत करणे, शिक्षकांची बैठक, काम वाटप, विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया आणि नवागतांच्या घरी भेटी यांसारखी कामे केली जातील. २३ जून रोजी शाळा प्रवेशोत्सवाचा मुख्य कार्यक्रम पार पडेल आणि त्याचा अहवाल त्याच दिवशी सादर केला जाईल. या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी गटशिक्षणाधिका?यांना निर्देश देण्यात आले आहेत. हा उपक्रम शाळा आणि विद्यार्थ्यांमध्ये बंध मजबूत करून शिक्षण प्रक्रियेला आनंददायी बनवण्याचा प्रयत्न आहे.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे श्री. मिलिंद त्र्यंबक इंगळे यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णनः मौजे रहाटगाव, सर्वे क्रं. १७३/१/अ, (ऑनलाईन सर्वे क्रं. १७३/१/अ/उ), प्लॉट क्रं. ३७, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे श्री. मिलिंद त्र्यंबक इंगळे हे, १) कृष्णा राजेंद्र टापरे २) सविद प्रशांत हुतके ३) क्षमा विनोदराव वैद्य यांच्या कडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तदनंतर, श्री. मिलिंद त्र्यंबक इंगळे यांनी PNB HOUSING FINANCE LIMITED. येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत दि. २३/११/२०२२ रोजीचे दस्त क्रं. ४३६१ हे मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान, पतसंस्था /राष्ट्रीयकृत/सहकारी अथवा खाजगी बँक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय–निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,
अमरावती मो. नं. ९८२३६९८७४५

